# समर्थांची भारुडे
(डॉ रामचंद्र देखणे)

काही विशिष्ट वर्गाची अभिरूची सोडली तर देशातील बहुसंख्य जनतेला जागृत करण्याचे सामर्थ्य लोकवाङ्मयातच आहे. लोकांची संघटना करणे, त्यांच्यात नवविचार पसरविणे व राष्ट्रऐक्य निर्माण करण्याचे काम भारूडे, पोवाडे, शाहिरी, बहुविधता, गेयता, रूपके, प्रबोधनविचार या साऱ्यांमुळे जनरंजनाबरोबरच लोकशिक्षणाचे आणि स्वधर्मजागृतीचे कार्य शतकानुशतके भारूडांनी केले आहे. 'भारूड' हे प्रबोधनाचे आणि लोकसंपर्काचे प्रभावी माध्यम असल्याने आध्यात्मिक विचारांची आणि नैतिक मूल्यांची शिकवण देण्यासाठी बहुतेक सर्वच संप्रदायांनी भारूडांचा पुरेपुर उपयोग करून घेतला आहे. मराठीतील आद्यभारूडे संत ज्ञानदेवांनी लिहिली. संत एकनाथांनी भारूडांना व्यापकत्व आणि लोकप्रियता मिळवून दिली. वारकरी संप्रदायाबरोबरच महानुभाव, समर्थ संप्रदाय, यांनीही आपले विचार लोकाभिमुख करण्यासाठी भारूडाची निर्मिती केली आहे.

## सामान्यांचे अनुभवविश्व

समर्थ संप्रदायाचे मुख्य प्रणेते आणि श्रेष्ठ प्रबोधनकार म्हणून संत रामदासांचे कार्य सर्वश्रुत आहे. समर्थ रामदास स्वामी हे तत्वचिंतक म्हणून जेवढे भावतात तेवढेच किंवा त्याहीपेक्षा अधिक लोकशिक्षक म्हणून जनमानसासमोर उभे राहतात. प्रवृत्तिवादी संत म्हणून समर्थ रामदासांना गौरविले जाते. परंतु प्रवृत्तिनिवृत्तीच्या सीमारेषा ओळखून दोहोंतही समन्वय साधून प्रवृत्ति-निवृत्तीमार्गाचा विवेक सांगण्यासाठी समर्थांनी त्यांच्या इतर वाङ्मयप्रकारांबरोबर लिहिलेली भारूडे ही अधिक प्रभावी ठरतात. समर्थांची भारूडे ही त्यांच्या वाङ्मयप्रकारातील वेगळेपण सिद्ध करतात. आपल्या धार्मिक व सामाजिक जीवनातील अंधभक्ति, विवेकशून्यता व आचारभ्रष्टता नाहीशी करून त्यात खऱ्या धर्मभावनेचे व आत्मप्रत्ययाचे वातावरण निर्माण करण्याचा समर्थांचा उद्देश होता. त्यासाठी त्यांनी यात्रा, उत्सव, हरिकथा, निरूपण यांद्वारा समुदाय उभा करण्याची प्रेरणा दिली. लोकसंपर्कासाठी तसेच सामान्यांच्या अनुभवविश्वाचे अवलोकन करण्यासाठी प्रचंड प्रवास केला आणि त्यातून मिळालेल्या समर्थ अनुभवांना बहुरूढ रूपकांमध्ये मोडून समर्थांनी भारूडे लिहिली.

## समर्थांची भारूडे

समर्थांची गाथ्यांमध्ये भारूडे, रूपके आणि तत्सदृश पदे अशा एकूण पन्नासच्या आसपास रचना आढळतात. त्यातील काही भारूडे ही अभंगसदृश तर काही 'पदे' या स्वरूपातील आहेत. समर्थांच्या भारूडांमध्ये मानवी भूमिका दर्शविणाऱ्या कानफाट्या, कापडी, जागल्या, जोगी, डबरी, पांगुळ, पांडे, वीर, दिवटा, पिंपळा, बहुरूपी, बाळसंतोष, बीजवर, बैरागी, वाघ्या, वासुदेव, सौरी यासारख्या लोकभूमिका प्रबोधनकाराच्या भूमिकेत उभ्या राहतात. पशु-पक्षी विषयक

भारूडांमध्ये उंदीर, कुत्रे, गाय, सावज, सर्प, तर 'खेळ-सण-उत्सवां' सारख्या विषयांमध्ये चेंडू, खेळ, टिपरी, लपंडाव, शिलंगण, होळी, गोंधळ आणि 'भूतपिशाच्च' विषयक रुपकांमध्ये चेटुक, झडपणी, अध्यात्मिक कोडी नवल, कोडे या रूपकांमध्ये, तर समाजात आढळणाऱ्या बहुरूढ गोष्टी आणि वृत्ति या आंबा, फूल, कुळवाडी, चौक, ठकडे, रजक, स्वप्न, वोसाण, वृत्ति या भारूडामध्ये बसवून समर्थांनी समाजात आढळणाऱ्या बहुरूढ रुपकांमध्ये सामान्यांच्या अनुभवविश्वाला पारलौकिकाचा स्पर्श दिला. विषयांची विविधता, संवादचातुर्य, कुटात्मकता, गेयता, सोपी आणि बोलीभाषा तसेच आध्यात्मिक व सामाजिक विचारांची रूपकात्मक मांडणी ही समर्थांची व्यापक दृष्टि भारूडांतून डोकावते. समर्थ हे केवळ अध्यात्म व भक्ति यांचे निरूपण करून थांबले नाहीत, तर त्यांनी व्यवहारधर्माचाही ऊहापोह केला आहे. अध्यात्मविचारात मायावाद किंवा जगन्मिथ्यत्व स्वीकारणाऱ्या तत्ववेत्त्यांची शिकवण ही नेहमी ऐहिक उत्कर्षाला दूरची वाटते, हा आक्षेप किती फोल आहे हे समर्थांच्या भारूडांवरून सहज ध्यानात येते. श्रीमद्शंकराचार्यांच्या अद्वैतमताला स्वीकारूनही त्यांनी भारूडांतून व्यावहारिक गुण-दोषांची उद्बोधक छाननी करून अध्यात्म व समाजनीती यांचा सुरेख समन्वय साधला आहे.

समर्थांचा खेळिया

समर्थांचे 'खेळिया' हे भारूड विश्वनिर्मितीची संकल्पना मांडत आहे. निर्गुण निराकार परमात्मा हा खेळिया आहे. त्याने स्वतःच्या विलासासाठी विश्वाची निर्मिती केली आहे. समर्थ खेळिया या भारूडात सांगतात.

खेळिया नवल कैसे झाले रे ।
आपणासी आपण व्याले रे ।
बाप ना माय ओगेचि होये ।
कर्णकुमारी पाहे रे ॥

उपनिषदातील 'एकोऽहं बहुस्याम्' म्हणजे मी एक असून बहुत्वाने नटावे या सिद्धांताप्रमाणे हा परमात्माच प्रसवला आणि विश्व निर्माण झाले. परमात्माच जगत्विलासात रममाण झाला. हे श्री संत ज्ञानदेवांचे 'चिद्विलास तत्व खेळिया' भारूडात सांगून समर्थांनी विश्वनिर्मितीचा खेळ मांडला आहे. हेच रूपक -

एक थोर नवलाव देखिला
स्त्रिया पुरूष गाभिणा केला
बाळकू माते लागुनि व्याला ........

अशा नवलाच्या पद्धतीने ‘नवल’ आणि ‘कोडे’ या भारूडांत मांडून परमात्मा त्याचे ब्रह्मस्वरूप, विश्वनिर्मितीसाठीत्याने धाडलेली माया, ब्रह्म आणि माया यांचा संबंध याचे सुरेख विवेचन केले आहे. आध्यात्मिकदृष्ट्या ही भारूडे खूपच उंची गाठतात.

विज्ञानी लक्ष लागो

समर्थांना केवळ तत्त्वचिंतक व्हायचे नव्हते तर सामाजिक विवेक जागा ठेवायचा होता. त्यासाठी समाजाला ‘जागृती’ ची जाणीव करून देणे आवश्यक होते. समर्थांचा पांगुळ आपले अपंगत्व सांगताना म्हणतो -

मी पणाचे मोडले पाय ।<br>
म्हणोनि पांगुळ झालो ।<br>
प्रेमफडके पसरूनिया ।<br>
कृपादान मागो आलो ।<br>
ज्ञानकाठी देई करी ।<br>
वैराग्य बोली पांघराया ........

हाता-पायाने पांगुळ झालेला पांगळा वेगळा आणि अज्ञानाने आत्मदृष्टि हरवलेला आणि संकल्पविकल्पाने अहंकाररूप होऊन मी पणाच्या पांगळ्या अवस्थेत तो सद्‌गुरुंकडे प्रेमभक्तीचे फडके पांघरून या वाटचालीत स्व रूपात रहात नाही. कारण अवघे ज्ञानरूप होऊन जाते.

लोकशिक्षकाची भूमिका घेऊन तत्त्वज्ञानाचे हे लोकवाङ्मयीन रूप भारूडातून मांडणाऱ्या ज्ञानदेवांच्या भारूडांमुळेच पुढे नाथांची भारूडे आधारभूत ठरणारी ज्ञानकाठी मागण्यासाठी आला आहे आणि प्रभुरामाच्या कृपेने -

राघवाचा धर्म जागो ।<br>
अधर्म रे भागो ।<br>
अज्ञान निरसुनिया ।<br>
विज्ञानी लक्ष लागो ।

अज्ञान घालवून परमात्मरूपी ज्ञानप्राप्तीसाठी मला विज्ञानदृष्टि लाभो अशी अपेक्षा तो करतो आहे. पांगुळ झाडावर बसतो आणि झाडाखाली एखादे पटकूर टाकून गाणे म्हणत दान मागतो. अज्ञानदृष्टि जाऊन विज्ञानदृष्टिचे विवेकी दान मागणारा समर्थांचा पांगुळ हा श्रेष्ठ प्रबोधनकार आहे.

समर्थांची भाकणुक

समर्थांची भारूडे जशी अध्यात्म विचारांची मांडणी करतात तसेच सामाजिक विकार आणि विकृतींचीही जनलोकांना जाणीव करून देतात.

या जोशाचे तळपट झाले ।
पोर बिजवरा दिधले ।
प्रथम वर म्हणोनिया ।
लटिके आम्हा चाळविले ।

असे वर्णन करून समर्थांनी बिजवर या आध्यात्मिक रूपकातून तत्कालिन समाजरचनेतील बिजवराशी लग्न लावण्याची विकृति मांडली आहे, तर हातात 'हुडकी' म्हणजे छोट्या डमरूसारखे वाद्य वाजवून पहाटे दान मागायला येणाऱ्या पिंगळ्याकरवी 'भाकणुक' सांगितली आहे.

भारूडातून समर्थांच्या व्यापक दृष्टीचेच दर्शन घडते. सुगम, अर्थगर्भ, अकृत्रिम, रोख ठोक, प्रगल्भ आणि प्राभावी भाषाशैली, अनुभवाचे वैपुल्य, अवलोकानाची सुक्ष्मता आणि सामाजिक जागृतीची आत्यंतिक भूमिका त्यांच्या प्रत्येक भरूडातून प्रगट होते. लोकांचे धर्मविषयक औदासीन्य, भ्रांती, भ्रष्टता नाहीशी करून त्यांच्या चित्तात शुद्ध परमार्थ विचार ठसवावा, त्याचबरोबर सामाजिक जीवन जगण्यासाठी आवश्यक असणारी नीतिमूल्ये सांगून परमार्थविवेकाबरोबर प्रपंचबोधाचेही निरूपण करावे, या हेतूने समर्थांनी लिहिलेली भारूडे हे समाजमनाचे जनजागरण घडवीत आहेत.